3. In biofuel production there is much development need and make the biofuel for widespread suitable to consumer use. It is possible by use of proper technology in this regards. When suitable technology is developed it can make biofuels as affordable and useable in widespread manner.
4. There is much more research needed to discover better plants for production of btotuel. attention should be needed to find out the biofuel plants that can be use minimum Water less space, and grow quickly.

**Jaya Ramdas Korde**
T.Y.B.Sc. (Botany)

# Mokhada (Bohada)



Mokhada is a small taluka situated close to Nature. There are tribal settlements in the entire taluka. Bohada is mask festival of tribes. Mokhada village is considered to be birth place of the Bohada festival. Jagdamba Mata Festival Bohada is celebrated with great enthusian every year after holi in Mokhada. But Bohada could not be celebrated last two years due to outbreak of Covid-19. This Bohada is filled for two days in a row. The festival takes in differant Villages such as mokhada, Khodala, Karegaon Dhobichapada, in Mokhada Taluka.

Tribal and non-tribal people from nearby places attend this festival. In this festival 52 Masks of Indian gods and goddess are exhibited. Mask owners wear these masks and give several performance during the celebreation.

The mask owners are responsible for maintaing their masks. These masks are renovated every year some days before the festival and later on preserved for next year. Bohada is to show gratitude to the village goddess. All the people happily celebrate Bohada festival in Mokhada taluka.

**Chandrakant Janu Gavit**
S.Y.B.A. (English)



# डिजीटल मार्केटिंग

**डिजीटल मार्केटिंग म्हणजे काय?**

गेल्या काही वर्षांपासून डिजीटल मार्केटिंग हे ट्रेडींगमध्ये नेहमी चर्चेला जाणाऱ्या विषयांपैकी एक आहे. येत्या काही वर्षांत मार्केटिंगसाठी हे प्रमुख माध्यम असणार आहे. म्हणून प्रत्येक व्यावसायिकाने डिजीटल मार्केटिंग मधील कुशल लोकांना नोकरीस ठेवणे आणि डिजीटल मार्केटिंगद्वारे आरओआय वाढविणे आवश्यक आहे.

सेल्स, आयटीसह इतर विभाग आणि उद्योगांतील नोकरदार करिअर म्हणून डिजीटल मार्केटिंगकडे वळत आहेत.

इंटरनेट सोबत जोडल्यानंतर प्रत्येक व्यक्ती हा एक नवीन डिजीटल वर्ल्ड सोबत जोडला जातो. तो इंटरनेटच्या माध्यमातून अशा गोष्टी मिळवू शकतो ज्या ऑफलाईन मिळतात. जसे की, बुक्स, गाईड, प्रोडक्ट, सर्व्हिस, बिजनेस आदी. खुप सारे लोक असे आहेत जे घरी बसल्याबसल्या कॉम्प्युटरद्वारे इंटरनेटवरच स्वत:चा जॉब/बिजनेस करतात आणि वर्षभर एकदाही ऑफिसला न जाता देखील आपली कमाई करतात. अशाच प्रकारचे अनेक सर्व्हिस बिजनेस स्ट्रॅटेजी जॉब आहेत जे आपण इंटरनेटच्या माध्यमातून करु शकतो. ज्यामध्ये डिजीटल मार्केटिंग हा एक महत्त्वाचा फीचर आहेत.

**सर्च इंजिन मार्केटिंग**

डिजीटल मार्केटिंगप्रमाणेच पेड डिजीटल मार्केटिंग टेक्निक हा एक प्रकार आहे. ज्याच्या मदतीने आपण सर्च इंजिन म्हणजे गुगल, बिंग, याहू यावर ॲडव्हर्टायईजमेंट लावू शकतो. त्याला सर्च इंजिन ॲड म्हणतात. इथून पेड ट्राफीक आपल्या बिजनेस आणि वेबसाईट पर्यंत आणू शकतो. डिजीटल मार्केटिंगच्या मदतीने आपण बिजनेसचा डेली, विकली, मंथली तसेच वार्षिक ग्रोथ जाणून घेऊ शकतो. त्याचप्रमाणे डेमोग्राफीक, फ्युनल, व्हिज्युलायझेशन, गोल्स सेटींगच्या माध्यमाने सगळ्या गोष्टी चांगल्या समजून घेऊ शकतो.

डिजीटल मार्केटिंगच्या मदतीने आपण हाय आरओआय (रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट) मिळवू शकतो. म्हणजे आपण जितकं प्रमोशनसाठी इन्व्हेस्ट करतो त्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात बिजनेस लीड, सेल मिळवू शकतो.

तसं पाहिलं तर इंटरनेटवर होणारी प्रत्येक ॲक्टीव्हीटी ही इंटरनेट मार्केटिंगचा भागच आहे. जे आपल्या बिजनेस प्रमोशनसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**अजय रामदास खोडे**

टी.वाय.बी.कॉम.



# ऑनलाईन शॉपिंग

इंटरनेटने आमची खरेदी करण्याच्या पद्धतीमध्ये क्रांती केली आहे. आजकाल अनेक व्यापारी इंटरनेट हे व्यवसायासाठी एक आधुनिक प्रभावी साधन मानतात. ऑनलाईन शॉपिंग म्हणजे इंटरनेट वरुन उत्पादने किंवा सेवा खरेदी करणे. दुसऱ्या शब्दांत ऑनलाईन शॉपिंग किंवा ई-शॉपिंग हा इलेक्टॉनिक कॉमर्सचा एक प्रकार आहे. जो ग्राहकांना वेब-ब्राऊझरचा वापर करुन इंटरनेटवरुन विक्रेत्यांकडून वस्तू किंवा सेवा थेट खरेदी करुन देतो. इंग्लिश उद्योजक मायकेल एल्ड्रिच यांनी १९७९ मध्ये ऑनलाईन शॉपिंगचा शोध लावला.

ऑनलाईन शॉपिंग क्षेत्र हे देशाच्या जीडीपीसाठी खुप महत्त्वाचे आहे. अलीकडे बऱ्याच परदेशी गुंतवणूकदारांनी यात रस दाखवला आहे. २१ व्या शतकात ऑनलाईन शॉपिंगने किरकोळ बाजारपेठेचा चेहरा पुर्णपणे बदलला आहे. किरकोळ विक्रेत्यांनी त्यांची उत्पादने इंटरनेटवर देऊ केली.

असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडियाने केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, भारतीय ग्राहकांच्या खरेदीच्या ट्रेंडमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. कारण ऑनलाईन शॉपिंगमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ५५% पेक्षा जास्त वाढ दाखवली आहे.

ऑनलाईन शॉपिंगमुळे आता आपल्याला यापुढे खरेदी करण्यासाठी मॉलला भेट देण्याची गरज नाही. फक्त आमच्या घरात आरामात बसून आम्ही आवश्यक उत्पादने खरेदी करु शकतो आणि ऑनलाईन पैसे देखील देऊ शकतो. ऑनलाईन शॉपिंग जलद, सोयीस्कर आहे. ज्याद्वारे तुमचा माल तुमच्या दारापर्यंत पोहोचतो. आत मॉलमध्ये जाण्याची गरज नाही, त्यामुळे तुमचे पैसे, वेळ आणि मेहनत वाचते.

अन्न आणि पुस्तकांपासून घरे आणि किराणा मालापर्यंत सर्व काही खरेदी करण्यासाठी अधिकाधिक लोक इंटरनेटकडे वळले आहेत. कोणत्याही वेळी खरेदी करणे शक्य आहे. ऑनलाईन शॉपिंगद्वारे त्याच्या आवडत्या वस्तु खरेदी करु शकतात. बऱ्याच शॉपिंग साईट्स लगेच डिलीव्हरी त्रासमुक्त रिटन्स आणि अगदी कॅश ऑन डिलिव्हरीचा पर्याय प्रदान करतात जो सर्वात मोठा अतिरिक्त फायदा आहे.

**जयेश रामदास पागी**
टी.वाय.बी.कॉम. (वाणिज्य)



# बुद्धिमत्ता म्हणजे काय?

सर्व ज्ञानात्मक प्रक्रियांचा समावेश करणाऱ्या मुळ ग्रीक शब्दाच्या लॅटीन भाषांतरावरुन Intelligence हा इंग्रजी शब्द 'बुद्धी' या अर्थी रुढ झालेला आहे. ॲरिस्टॉटलच्या काळात बोधात्मक क्षमता किंवा ज्ञानात्मक क्षमता घेऊनच मनुष्य प्राणी जन्माला येत असतो, असे गृहीत धरले गेले होते. या जन्मजात क्षमतेला बुद्धी हे नाव दिले गेले होते.

मानसशास्त्रज्ञ 'बिने' हा बुद्धिमापनाचा जनक समजला जातो. समाजातील विविध व्यक्तींच्या तुलनेसाठी बुद्धिगुणांक हा घटक प्रामुख्याने घेतला जातो. नित्याच्या व्यवहारात आपण बुद्धी, बुद्धीमत्ता, बुद्धीगुणांक असे वेगवेगळे शब्द वापरतो.



'बिने'च्या मते बुद्धिमत्ता म्हणजे निर्णयक्षमता, सामान्यज्ञान, पुढाकार घेण्याची क्षमता, प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, योग्य निर्णय, तर्कशुद्ध विचारक्षमता व कोणतीही गोष्ट समजून घेण्याची क्षमता म्हणजे बुद्धीमत्ता होय.

'बुडवर्थ'च्या मते विचार-कौशल्यांचा प्रकट उपयोग म्हणजे बुद्धिमत्ता होय. तसेच दैनंदिन व्यवहारात व्यक्तीला जे नवीन अनुभव येतात ते ग्रहण करुन भविष्यकाळात त्याचा नेमका उपयोग करण्याच्या मानसिक क्षमतेस काहींनी बुद्धिमत्ता म्हटले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, पुर्वानुभवातून शिकण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय.

भोवतालच्या परिस्थितीशी मिळते जुळते घेऊन समस्या सोडवण्याची मानसिक क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय.

'थॉर्नडाईक, वेश्लर' यांच्या मते तर्कशुद्ध विचार सहेतुक काम आणि परिस्थितीच्या अनुरुप असे परिणामकारक वर्तन करण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय.

बुद्धिमत्ता विषयक सिद्धांत

बुद्धिमत्तेसंबंधी ज्या निरनिराळ्या व्याख्या देण्यात येतात त्या व्याख्यांपैकी काहींनी असे सुचीत होते की बुद्धिमत्ता ही एकच योग्यता होय तर काही व्याख्या व्यापक स्वरुपाच्या असून त्यात शिकणे, पठण करणे, प्रत्यक्ष तर्कानुमान इत्यादी ज्ञानात्मक घटनांचा समावेश होतो. बालकाच्या वाढत्या वयानुसार त्याच्या मानसिक क्षमतांचा विकास होत जातो. समस्या-परिहार क्षमता, अध्ययन क्षमता तसेच अमूर्त विचार यासारख्या क्षमतांचा बुद्धिमत्तेमध्ये समावेश होतो. असे असले तरी केवळ एवढ्यावरुन बुद्धिमत्तेचे स्वरुप लक्षात येत नाही. यासाठी बुद्धिमत्तेच्या स्वरुपाविषयी माहिती देणारे अनेक सिद्धांत आज प्रचलित आहेत. त्यांच्यापैकी एक सिद्धांत खालीलप्रमाणे -

**स्पीअरमनचा सामान्य घटक किंवा द्विघटक सिद्धांत :**

१९२७ मध्ये ब्रिटिश मानसशास्त्रज्ञ चार्ल्स, स्पीअरमन यांनी बुद्धीचे दोन घटक असतात हा सिद्धांत मांडला. त्याच्यामते बुद्धी म्हणजे फक्त एकच एक निर्भेळ गोष्ट नाही. बुद्धिमत्तेस एक साधारण घटक (G-Factor) असतो व तर काही विशेष घटक (Specific-Factor) असतात की जे त्या-त्या बौद्धिक क्रियेशी विशेष संबंधित असतात. या सिद्धांतानुसार विविध कार्यातील यश संपादन करण्याची व्यक्तीची क्षमता म्हणजे एकाच सर्वसाधारण बुद्धिमत्तेचे अविष्कार होय. तसेच व्यक्तीला ज्ञान प्राप्त करुन देणाऱ्या ज्या विविध क्षमता आहेत त्यांचा एकमेकांशी संबंध असतो, असे या सिद्धांतावरुन स्पष्ट होते. त्यांच्यामते व्यक्तीच्या सर्व क्रियांमध्ये बुद्धीतील हा सामान्य घटक क्रियाशील असतो. या सिद्धांताच्या आधारे तयार केलेल्या बुद्धिमापन चाचण्या या सामान्यत: 'एक गुणांक' स्वरुपाच्या मानल्या जातात. बुद्धिगुणांक चाचणीच्या आधारे प्राप्त होणारा हा एक गुणांक म्हणजेच सामान्य घटक असून बुद्धीच्या वेगवेगळ्या पैलूंचे, घटकांचे प्रतिनिधीत्व हा बुद्धिगुणांक करीत असतो.

**निलेश गोविंद पागी**
एफ.वाय.बी.ए. (मानसशास्त्र)

# वाशाळा लेणी

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारसामध्ये तीन प्रकारच्या वास्तू या ठळकपणे नजरेत भरतात. लेणी, मंदिरे आणि किल्ले.

लेणी म्हणजे डोंगर, टेकडी, पर्वत, खडक कोरुन तयार केलेल्या गुहा होय. ज्यांचा उपयोग संन्यासी भिक्षुकांना, तीर्थंकर तपश्चर्या-साधना-विश्रांती करण्यासाठी केला जाई. लेणी प्रामुख्याने सातवाहन, यादव, वाकाटक व राष्ट्रकूट या राजवंशाच्या काळात कोरली गेली. भारतात आज माहित असलेल्या सुमारे १००० लेणी आहेत. महाराष्ट्रात यापैकी ९० टक्के लेणी आहेत.

महाराष्ट्रात लेणी खोदण्याचा इतिहास तसा दुसरे शतक ते बाराव्या शतकापर्यंतचा आहे. म्हणजे साहजिक या लेण्यांना नक्कीच दहा हजार वर्षांचा इतिहास आहे. त्यापैकी ही एक वाशाळा लेणी. एवढ्या दुर्गम भागात ही लेणी का कोरली असावी ? वाशाळा गावातील व आजूबाजूच्या गावातील लोक लेणीला वसई म्हणतात. माझ्या माहितीप्रमाणे या लेणीची शासकीय दप्तरी पुरातन खात्याकडे याची माहिती नसावी. काळाच्या पडद्याआड अशा शेकडो अपरिचित लेण्या या सह्याद्रीच्या कुशीत सामावलेल्या आहे. त्यापैकी ही एक लेणी.

गावाला लागुनच डोंगराच्या पायथ्याशी ही प्राचीन लेणी आहे. मी विचारलेल्या व्यक्तीकडून मिळालेल्या माहितीनुसार ही लेणी अर्धवट आहे. पण सुरुवात अप्रतिम केलेली दिसते. दुमजली लेणी करण्याची जी पद्धत तीच इथे वापरली आहे. येथे बघितल्यानंतर असं लक्षात येते की येथे तळ मजला आणि पहिला मजला अशी रचना दिसते. जिन्याचं काम पण अर्धवट राहिले आहे. ही जैन धर्माची लेणी आहे. आत मध्ये दोन जैन तिर्थकरांच्या खड्गासनातील मुर्ती म्हणजे प्रतिमा उभ्या स्वरुपात आहे. जैन धर्मात एकुण चोवीस तिर्थकार आहेत व त्यातील दोन तीर्थकरांच्या मुर्ती असाव्यात. दोन्हीही सारख्या असल्यामुळे मुर्ती नेमकी कुणाची असावी हे ओळखणे कठीण जाते.

सुरुवातीस दोन पायऱ्या त्यावर सुंदर नक्षीकाम केले आहे. चौथरा केला आहे. त्यावर पण नक्षीकाम केलं आहे. बाजूलाच खडकात कोरलेली पाण्याची विहीर आहे. त्यालाच लागून खडकात एक शंकराची छोटीशी पिंड कोरलेली आढळून येते. दर्शनी भागात सुंदर दोन दगडी खांब उभे आहे. त्यावर थोडा छोटा बांधीव दगडी मंडप आहे. बाजूच्या दगडी भिंतीमध्ये पाणी बाहेर जाण्यासाठी दगडात कोरलेल्या दोन नळ्या आहे. त्या नंतर मुख्य दरवाजावर काहीतरी कोरलेले आहे.



पण स्पष्ट दिसत नाही. तेथून आत गेले की १० बाय १५ ची गुफा आहे. आवाज खुपच घुमतो. समोरच्या बाजूस दोन जैन मुर्ती प्रतिमा खडकावर कोरलेल्या आहेत. दोन्ही मुर्तींमध्ये व बाजुला कप्पे आहेत. दोन तीन फुटलेली शिल्पे आहेत. एक शिवलिंग आहे. हे नंतर ठेवले असेल. चारही कोपऱ्यात दिवे लावण्यासाठी जागा आहे. काम अर्धवट राहिल्याच्या अनेक खुणा इथे दिसतात. इथे खुप काही बघण्यासाठी नाही पण हा हजारो वर्षांचा इतिहास आहे.

नाशिक भागात अंकाई, टंकाई, इगतपुरी ते त्र्यंबकेश्वर, अंजनेरी या भागात आठव्या शतकात जैन लेणी व मंदिरे याची निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली आढळून येते. त्रिंगलवाडी लेणी, अंजनेरी जैन लेणी, मंदिरे याचेच पुरावे देतात. त्याच काळात ही लेणी कोरली असावी. लेण्या का कोरलेल्या असायच्या तर त्याकाळी जैन तीर्थकार धर्म प्रसारासाठी फिरत असत. त्यांचा दिनचर्या पाळायचा नियम कडक असत. ते नियम पाळणे सुलभ व्हावे आणि धर्म प्रसारासाठी फिरणाऱ्या तीर्थकार यांना ध्यान-धारणा सहज करता यावी, पावसाळी निवास करण्यासाठी अशा लेणी कोरुन घेत असत.

जव्हार पासून पंचवीस किलोमीटर अंतर आहे. जव्हार वरुन बस आहे. मोखाडामधून प्रत्येक तासाला गाडी जाते.

**सुनिता चंदर चितेकर**

एम.ए. १ (इतिहास)

# झाप येथील भुपतगड

पालघर जिल्ह्यातील एका घनदाट जंगलाने वेढलेल्या प्रदेशात ज्याला 'कोळवण' असे म्हटले जाते. या कोळवणात जव्हार, मोखाडा या परिसराचा समावेश होतो. शिवकाळात येथे घनदाट जंगल होते. या जंगलातूनच नाशिकला जाणारा प्रवाशी व व्यापारी लोकांचा मार्ग जात असल्याने त्यावर देखरेख ठेवण्यासाठी भुपतगडाची निर्मिती केली असावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या गडावर जव्हारच्या आदिवासी राज्यांचे वर्चस्व होते. जव्हारपासून १५ किलोमीटर अंतरावर झाप गावाच्या मागे भुपतगड उभा आहे. जव्हार आणि मोखाडा तालुक्याच्या सिमेवरील भुपतगडावर वाडा, त्र्यंबकमार्गे मोखाडा तालुक्यातील कुर्ळोद या गावातून आपल्याला चढता येते.

जव्हारचे प्राचीन नाव 'भवसाहार प्रक्षादिगण' होते. झाप गावातून तासभर चालले की आपण गडाच्या पायथ्याशी पोहोचतो. नंतर पुन्हा वेली झुडुपातून मार्ग काढून प्रवेशद्वारापाशी येतो. पण आता हे प्रवेशद्वार नष्ट झाले आहे. मात्र गडाचे दोन्ही बुरुज अर्धवट उभे आहेत. गडाची उंची साधारणत: ७०० फूट आहे. शिखरमाथ्यावरील गडाचा पसारा ऐसपैस आहे. सुमारे १४०० फूट लांब आणि २०० फूट रुंद असुन शिलाहारांनी या गडाची निर्मिती केली आहे. गडाला बालेकिल्ला आहे. बालेकिल्ल्यात एका प्रचंड वाड्याचे अवशेष आहेत. किल्ल्याची तटबंदी साधारण रुंद असून अर्धवट उभी आहे. एका बाजूने पाण्याचा हौद आहे. दक्षिणेला तलाव सुद्धा आहे. गडावर खडकात खोदलेली पाण्याची टाकी आणि इमारतीचे अवशेष आहेत. गडावरुन पुर्वेला बघितले की उंचच उंच रांगा दिसतात. ब्रह्मगड, हरीषगड हा परिसर सुद्धा नजरेच्या टप्प्यात येतो. अशा प्रकारे या गडाविषयी माहिती साधारणत: सांगता येईल. आणि ऐतिहासिकदृष्ट्या या गडाला पर्यटक भेटी सुद्धा देतात.

**कैलास जंगली**

एम.ए. भाग- १ (इतिहास)



# कोरोनामुळे मोखाडा परिसरातील लोकांवर झालेला परिणाम

कोरोना महामारी ही एखाद्या जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हती तर या महामारीने जगातील अनेक देशांमध्ये शिरकाव केला होता. कोरोना व्हायरस हा २०१९ मध्ये चीनमध्ये आढळून आला. हा कोरोना व्हायरस २०२० च्या सुरुवातीस संपूर्णपणे जगभर पसरला. कोरोना नावाच्या विषाणूने संपूर्ण जगभर भितीचे वातावरण निर्माण केले. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक, पर्यटन, दळणवळण व ग्रामीण भागातील लोकांवर परिणाम झालेला आपल्याला पहायला मिळाला.

जगातील अनेक लोकांवर परिणाम झाला. त्याप्रमाणे मोखाडा परिसरातील लोकांवर झालेला परिणाम - मार्च २०२० मध्ये जेव्हा जनता कर्फ्यू लागू करण्यात आला. त्यावेळी लोकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. गावाकडील लोकांच्या मनामध्ये खूप भिती निर्माण झाली. कारण बरीचशी लोकंही रोजगाराच्या निमित्ताने बाहेरगावी गेले होते. त्यांना येण्या-जाण्याची सोय नव्हती. लोकांनी जी वाहने मिळतील त्या वाहनाने व पायपीट करीत कसेबसे आपल्या गावी पोचले. गावाहून आलेल्या व्यक्तीने १४ दिवस बाहेर राहावे म्हणून काही लोकं ही शेतावरील घरात/जंगलात राहू लागले. त्यांना घरची लोकं जेवणाची सोय करीत असत. मार्च, एप्रिल व मे महिना आला. कोरोना रुग्णांची संख्या मात्र सातत्याने वाढतच होती. त्यामुळे सामान्य जनतेला काही रोजगार मिळेनासे झाले. त्यामुळे आर्थिक घटकांवर परिणाम झाला. कोरोनामुळे प्रत्येक वस्तुच्या किंमती हळूवळू वाढू लागल्या. काही गावातील लोकांनी गावात कोरोनाचे संकट येवू नये म्हणून काही तातडीने निर्णय घेतले. जसे की, एका गावातील व्यक्ती दुसऱ्या गावामध्ये जाऊ नये. तालुक्याच्या ठिकाणी जावू नये. ज्या वस्तु गावपातळीवर उपलब्ध असतील त्या वस्तुवरच ही सर्व लोकं उपजीविका भागवू लागले. पावसाळा सुरु झाल्यानंतर शहरांमध्ये कोरोना रुग्णांची संख्या वाढतच होती. परंतु ग्रामीण भागातील सर्व लोक ही आपापल्या शेतीच्या कामामध्ये गुंतले. त्यामुळे लोकांशी काहीही संपर्क आला नाही. ग्रामीण भागात कोरोना रुग्णांची संख्या कमी होती. दिवाळीनंतर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागली. त्यामुळे प्रत्येक गावामध्ये विलगीकरण कक्षांची उभारणी करण्यात आली. नंतर काही दिवसांमध्ये रुग्णांची संख्या कमी झाली. टाळेबंदीमुळे संपूर्ण जग अगदी स्तब्ध झाले.

**प्रा. आर. डी. घाटाळ**
(मराठी विभाग)



# Malnutrition: With Reference of Mokhada Taluka

The term 'malnutrition' has described as a deficiency, excess or imbalance of a wide range of nutrients, resulting in a measurable adverse effect on body composition, function and clinical outcome.It means "poor nutrition" and can refer to: under nutrition – not getting enough nutrients. Malnutrition is a condition which occurs when there is a deficiency of certain vital nutrients in a person's diet. The deficiency fails to meet the demands of the body leading to effects on the growth, physical health, mood, behavior and other functions of the body.

Malnutrition is a complex issue for India. It is an example of how India is a nation of extremes. Many among the population live in poverty and are not able to obtain as much food as they need. This is contrasted by the ever expanding number of people within the country suffering from obesity.In India 44% of children under the age of 5 are underweight. 72% of infants and 52% of married women have anemia. Malnutrition during pregnancy causes the child to have an increased risk of future diseases, physical retardation, and reduced cognitive abilities. This poverty does not directly lead to malnutrition but it leaves a large chunk of the population without adequate amounts of food. This makes a lack of access to food since people are too poor to go out and purchase it. In India, the mortality of children under the age of five was about 59 out of every 1000 live births which is one of the highest rates in the world.

The nutrition situation in Maharashtra is slightly better than the national average with improvements except for an increase of anemia prevalence among pregnant women.The feeding practice for children aged 6-9 months shows an alarming pattern with only 48% of children aged 6-9 months receiving solid or semisolid food and breast milk. This is significantly lower than the national average of almost 56%. Furthermore, the prevalence drops to 40% for rural areas compared with the national average of 54% and as low as 23.3% for non-educated mothers compared with the national average of 49%.The prevalence of overweight and obesity in Maharashtra is higher than the national average for both female and male with Mumbai reaching almost 35% of obesity among the female population.Within Maharashtra, there are significant differences between rural and urban areas with the rural areas being more affected by malnutrition. However, the most outstanding gap in all indicators is between non-educated and well-educated respondents.The prevalence drops as low as 40% in rural areas (India rural 54%) and 23.3% among non-educated mothers (India non-educated 49%) showing a high-priority gap. The prevalence in urban areas and in Mumbai is 58% and 56.6% respectively (India urban 62.1%).

Mokhada is a taluka in Palghar district in Maharashtra state, India. Mokhada is a tribal area. most Adiwasi in Mokhada taluka belong to warli, kolimahadev, Thakur and kokana tribes. Mokhada has a total Population of 1,06,820 peoples. The total literacy rate of Mokhada is 56.48%.

Among the tribal population of mokhada taluka, high levels of malnutrition with women and children the most affected is a major challenge they face, besides those of poor literacy, lack of empowerment, below poverty line, and unemployment. The nutritional and health issues of tribal women and children can be addressed by giving them iron and folic supplements, supplying them with fortified food and through deworming, besides other interventions. Malnutrition has necessarily to be approached from a life cycle perspective. An underweight, anaemic pregnant teen mother has to contend with early pregnancy, inadequate spacing between successive births and poor prenatal nutrition and healthcare. The resulting low birth weight baby faces poor healthcare, hygiene and nutrition practices and develops into a stunted and underweight adolescent. This pattern is

replicated over subsequent generations of mothers.

**Causes of Malnutrition:**

Malnutrition is caused by a lack of nutrients, either as a result of a poor diet or problems absorbing nutrients from food. Certain things can increase your risk of becoming malnourished. Malnutrition can occur for various reasons. The sections below outline these potential causes in more detail.

- Lack of food: this is common among the low income group as well as those who are homeless.
- Those having difficulty eating due to painful teeth or other painful lesions of the mouth. Those with dysphasia or difficulty swallowing are also at risk of malnutrition. This could be due to a blockage in the throat or mouth or due to sores in the mouth.
- Those with a limited knowledge about nutrition tend to follow an unhealthy diet with not enough nutrients, vitamins and minerals and are at risk of malnutrition.
- Elderly living alone, disabled persons living alone or young students living on their own often have difficulty cooking healthy balanced meals for themselves and may be at risk of malnutrition.
- Those with eating disorders like anorexia nervosa have difficulty maintaining adequate nutrition.
- Those with diarrhea or persistent nausea or vomiting.
- Some medications tend to alter the body's ability to absorb and break down nutrients and taking these may lead to malnutrition.
- The demand for energy from food exceeds the amount of food taken. This includes those who have suffered a serious injury, burn or after major surgical procedures. This also includes pregnant women and children whose growth and needs for the unborn baby causes increased demand for nutrients and calories that may be deficient in a normal diet.
- Premature babies are at a higher risk of malnutrition as are infants at the time of weaning.
- Childhood cancers, heart defects from birth (congenital heart disease), cystic fibrosis and other major long term diseases in children are the leading cause of malnutrition.
- Neglected children, orphans and those living in care homes are at risk of malnutrition.

**Effects of Malnutrition:**

The imbalance in nutrients first shows in blood and tissue followed by metabolic processes finally, tell-tale signs and symptoms appear. The effects of malnutrition include: changes in body mass, poor wound healing, severe weight loss and organ failure among others, all of which are described below.

It can lead to serious health issues, including stunted growth, eye problems, diabetes and heart disease. Malnutrition affects billions of people worldwide. Some populations have a high risk of developing certain types of malnutrition depending on their environment, lifestyle and resources.

In mokhada taluka, due to high prevalence of malnutrition, Scitech Soyamate machine project has founded by Science & Technology Park Pune. So that, Rayat Shikshan Sanstha's Arts, Science and Commerce College Mokhadahas started a project of scitech soyamate machine under the guidance of principal Dr. L. D. Bhor. Arts, saciene and commerce college has distributed 10 scitech soyamate machine for Z. P. schools in Takpada, Ambepani, Kawalpada, Warghadpada, Bhendichapada, Ghosali, Loharpada, Telipada, Gumbadpada and Gabhalpada. There are every Z. P. schools providing soya milk to the children twice in a week. This scitech soyamate machine will help reduce the malnutrition of malnourished children in tribal rural areas.


Proper diet or right Nutrition is the basic need for all the Human beings for the development and the growth. Nutrition constitutes the foundation for human development, by reducing susceptibility to infections, reducing related morbidity, disability and mortality, enhancing cumulative lifelong learning capacities, and adult productivity.

**Korde Kalpesh**

FYBA (English)

# माझी मराठी मातृभाषा

मराठी भाषा आमुची मायबोली म्हणजे मातृभाषा. लहान मुलं जन्मल्यापासून आईजवळच असते. तेव्हा ती ज्या भाषेत बोलते ती भाषा होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषा प्रत्येक प्रांताची निराळी. ती तेथील लोकांची होते आणि ती आडते. आपली मराठी भाषा संस्कृत भाषेतून आली. तशा भारतातल्या बहुतेक सर्व भाषा संस्कृत भाषेपासून निर्माण झाल्या. आपली मराठी भाषा सर्व महाराष्ट्राची जरी एक असली तरी ती दर बारा कोसावर बदलते. लेखी भाषा तीच असली तरी बोलीभाषेत फरक होतात. तिचे हेल वेगळे होतात. मराठी भाषेतसुद्धा असे वेगळे प्रकार होतात. कोकणातली कोकणी, घाटावरची म्हणजे देशावरची वेगळी, घाटी भाषा वेगळी, वऱ्हाळी भाषा वेगळी मध्यप्रांतातली, मध्यप्रदेशातली हिंदी मिश्रित आणि गोव्याकडील कोकणी वेगळी असते.



मराठी भाषा लवचिक आहे थोड्या थोड्या फरकाने शब्दांचे अर्थ बदलतात. मुंबईची मराठी भाषा हल्ली खिचडी भाषा झाली आहे. शुद्ध मराठी राहिली नाही. तिच्यात हिंदी, मराठी, इंग्रजी यांची भेसळ झाली आहे. हिंदी आणि इंग्रजी सिनेमा पाहुन भाषा अशी झाली आहे. पुर्वी मराठीला राजभाषेचा मान नव्हता. पण आता काही प्रमाणात आहे.

'खेड्यापाड्यातली रांगडी आणि
अशुद्ध, अपभ्रंश असलेली भाषा असते,
कशीही असो ती मराठीच
म्हणून मराठी माणसाला आवडते.''

आपल्या भाषेचा आपल्याला अभिमान असतो. पण अलिकडे आपल्या तरुण मंडळीला इंग्रजी भाषेचे जास्त आकर्षण! त्यात त्यांचा दोष नाही. कारण त्यांचं महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण सर्व इंग्रजीतून होत असतं. पदव्या मिळवून तरुण मंडळी परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. तिथे इंग्रजी भाषाच बोलावी, लिहावी लागते. साहजिकच त्या भाषेचे संस्कार घडत असतात. त्या विकसित देशात आपल्या लोकांना द्रव्यप्राप्ती भारतातील लोकांपेक्षा जास्त प्रमाणात होते. त्यामुळे त्यांना तिकडेच राहणे सुखाचे होते. त्यांचे संसार तिथेच होतात. सर्वजण नाही पण काही तिथेच स्थायिक होतात. त्यामुळे त्या मुलांची 'मायबोली' तिकडचीच होते. हा विषय जरा वेगळा असला तरी मराठी भाषेवर, राहणीवर आचार-विचारांवर खुपच फरक होतो. त्यांचं शिक्षणही तिकडेच होते. त्यामुळे मराठीचा त्यांना गंध, माहितीवार्ता नाही. संस्कारही तिथलेच, असे तिकडे राहिल्यामुळे होते. पण भारतात राहणाऱ्या तरुणांना आपल्या भाषेचा अभिमान नाही आणि तयंना स्वत:च कौतुकही वाटते तेव्हा तुम्ही शिकून मोठे व्हा. उच्च शिक्षणासाठी परदेशात गेलात तरी हरकत नाही, पण काम झाल्यावर परत आपल्या भारतात या.

महाराष्ट्राला आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा करुन द्या. परभाषा जरी अवगत झाली आणि परदेशात गेलात तरी आपल्या मराठीला विसरु नका. प्रत्येक मराठी माणसाला मराठी बोलता, लिहिता-वाचता आली पाहिजे. आपल्या मराठीतसुद्धा खुप विषयांवर लेखन झाले आहे. शास्त्र-विज्ञान, ललित साहित्य आहे. परदेशातुन स्वदेशात येण्यासाठी 'सागरा प्राण तळमळला' म्हणणारे स्वातंत्र्यसूर्य सावरकरांची आठवण ठेवा.

**मेघा शंकर शिंदे**

टी.वाय.बी.एस्सी.

# मोखाड्यातील इतिहासाच्या पाऊलखुणा

मोखाडा परिसराला इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. इतिहासातील स्थापत्याचा महत्वपूर्ण प्रकार म्हणजे मूर्ती व विरगळ हा आहे. असे विरगळ मोखाडा परिसरात पाहायला मिळतात. खोच व पाळसुंडा येथील विर्गालांची माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे. प्रथम विरगळ म्हणजे काय याची माहिती आपण घेऊ.

**विरगळ –**

'विरगळ म्हणजे वीर पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला स्तंभ असतो. यास वीरस्तंभ असेही म्हणतात.'

ज्यामुळे वीरगती मिळाली त्यानुसार वर्गीकरण.

१. **वीरबळी वीरगळ–** ही जे वीर राजा युद्धात जिंकावा म्हणून स्वतः स्वतःच्या हाताने शिरच्छेद करून घेत त्यांची शिळा.

२. **गोवर्धन/गोधन वीरगळ–** यादव काळात गोधन हेच श्रेष्ठ धन होते मग त्याची प्राणी वा दुसऱ्या गावाकडून गोवर्धन/गोधन वीरगळ

३. **पशु वीरगळ–** गावावर झालेला वाघ, रानगवे इ पशूंचा हल्ला परतवताना आलेले वीरमरण

४. **द्वंद्व वीरगळ–** दोन गावातील तुल्यबळ वीरांचे युद्ध/ कुस्ती यात आलेले वीरमरण

५. **डोली वीरगळ–** लग्न विधीत झालेले हल्ले, विघ्न दूर करताना आलेले वीरमरण.

६. **गाववली परचक्र युद्ध–** एक वीर अनेकांशी लढताना आलेले वीरमरण

७. **अश्वदल/गजदल वीरगळ–** मोठ्या युद्धात आलेले वीरमरण

८. **चौर्य वीरगळ–** चोरांचे हल्ले परतवताना आलेले वीरमरण. यात चोरांकडे तलवारी तर ते लढणारे सामान्य असल्याने त्यांच्याकडे काठी असे चित्र कोरलेले असते.

९. **साधू/संत वीरगळ–** राक्षसांचे हल्ले परतवताना साधूंना आलेले वीरमरण.

१०. **सूर वीरगळ–** या शिलेवर अनेक वाद्य असतात. /एखाद्या कलाकारांचे वीरमरण

११. **ताबूत वीरगळ–** विशेष स्मृती असलेल्या शिळा

अशा प्रकारचे विरगळ मोखाडा परिसरात आढळतात.

**खोच (पिंपळपाडा) –**



मोखाडा शहराच्या पूर्वेला ४.५ कि.मी. अंतरावर खोच (पिंपळपाडा) आहे. या पाड्याच्या दक्षिण दिशेला हा स्तंभ आहे. या स्तंभाची रचना व स्थान अद्भुत दिसते. स्तंभाची उभारणी चौथऱ्यावर आहे. तळाची लांबी १.११ फुट तर पहिल्या भागाची उंची १.१० फुट आहे. या भागात चारही बाजूला खूप सुंदर नक्षीकाम केलेले आहे. दक्षिण बाजूला एका घोड्यावर तलवार धारण केलेला पुरुष व त्याच्या मागे स्त्री बसलेली आहे. हे चित्र महाराष्ट्रातील जेजुरी येथील खंडोबाच्या घोड्यावरील चित्राशी मिळते जुळते दिसते. उत्तर बाजूला घोड्यावर स्त्री व पुरुष बसलेले आहेत. पुरुषाच्या एका हातात तलवार व दुसऱ्या हातात गदेच चित्र दिसत आहे. स्तंभाच्या पश्चिमेला हत्तीच चित्र आहे. हत्तीवर अंबारी असून त्यामध्ये व्यक्ती बसलेली आहे. स्तंभाच्या पूर्वेला माशाच चित्र कोरलेले आहे. त्याच्या शेजारी वरच्या बाजूस दोन पोपट एकमेकांसमोर मानेपासून वरच्या भागाचे चित्र रेखाटल आहे.

दुसरा भाग १.०८ फुट रुंद असून दक्षिण बाजूस एकमेकाच्या समोर दोन पोपटांचे चित्र काढलेले आहे. पूर्वेकडच्या बाजूस डाव्या बाजूला सूर्य आणि उजव्या बाजूला चंद्रकोरीच चित्र रेखाटल आहे. उत्तर व पश्चिम दिशेला काही रेषा दिसतात परंतु स्पष्ट चित्र दिसत नाही.

तिसऱ्या भागाची रुंदी १.०६ फुट आहे. चार कोपऱ्यावरती स्तंभाला पाकळ्या काढलेल्या आहेत. त्यामुळे स्तंभ आणखीच सुंदर दिसतो.

शेवटी शिखराचा भाग आहे. त्यामध्ये गोल वर्तुळाकार पूर्ण स्तंभाला नक्षी कोरलेली आहे. त्यानंतर सुंदर अशी पंचकोनाची नक्षी खोदलेली आहे. शेवटी वरच्या बाजूला घुमटाकार गोल शिखराचा भाग आहे.

या स्तंभापासून ५० मीटर आंतर पश्चिमेकडे एक चौथरा आहे. त्यावर एकूण तीन स्तंभ आहेत. त्यातील दोन मध्यम स्वरूपाचा व तिसरा स्तंभ छोटा आहे. त्या स्तंभांची रचना तळभागाकडून वरच्या बाजूला चार भाग व शेवटी शिखराच्या आकाराचा गोल भाग कोरलेला आहे. तेथून पुढे २० मीटर अंतरावर एका झाडाच्या बुडाशेजारी स्तंभ आहे. त्यावरही रेषांच्या स्वरुपात नक्षीकाम केलेले आहे.

**पळसुंडा येथील स्तंभ –**



मोखाडा ते पळसुंडा ६ कि.मी. अंतर आहे. पळसुंडा येथून पश्चिमेकडे २ कि.मी. अंतरावर पळसुंडा आश्रम शाळेकडे जाताना उजव्या बाजूला हा स्तंभ आहे. पळसुंडा येथील ग्रामस्थ त्याची पूजा – अर्चा करतात. स्तंभाच्या संरक्षणासाठी पत्रे ठोकून शेडचा निवारा केला आहे. स्तंभाच्या शिखराकडील बाजूला लोक दोरे बांधतात आणि शेंदूर लावतात तसेच स्तंभावरील चित्रांनाही शेंदूर लावतात. त्यामुळे चित्र मूळ स्थितीत दिसत नाहीत. पूर्वेकडील बाजूला घोड्यावर एक पुरुष व स्त्री बसलेली आहे. घोडा धावतानाचे चित्र आहे. हा स्तंभ एकूण आठ भागात विभागला आहे. पहिल्या दोन भागात स्तंभाला कोरीव कडा आहेत. तिसऱ्या भागाच्या रचनेत उत्तरेला घोड्यावर एक पुरुष बसलेला आहे. त्याच्या हातात शस्त्र धरलेले आहे. पश्चिम दिशेला घोड्यावर स्त्री व पुरुष बसलेले आहेत. त्या घोड्याच्या समोर एक व्यक्ती आडवी उभी आहे. हे चित्र रेखीव दिसते. दक्षिण दिशेला घोड्यावर बसलेली एक व्यक्ती आहे. घोडा घेऊन जाणारी व्यक्ती पुढे चालत आहे.

चौथ्या भागात पूर्वेला सपाट भाग उत्तरेला हनुमानाचे चित्र कोरले आहे. पश्चिमेला नक्षीकाम केले आहे. पाचव्या भागात चारही कोपऱ्यावर कमळाच्या आकाराच्या पाकळ्या कोरल्या आहेत. सहावा भाग गोल वर्तुळाकार आहे. सातव्या भागात फुलांच्या पाकळ्यांची नक्षी कोरलेली आहे. तर शेवटी शिखराकडे गोल गुंबदाकार तयार केलेला दिसतो.



**डॉ. जाधव संतोष हनुमंत**

इतिहास विभाग

# आल्बर्ट बंण्डुरा : सामाजिक अध्ययन सिद्धांत



एकीकडे फ्राईडने आंतरिक प्रेरणांना सर्वस्व मानले तर दुसरीकडे वर्तनवाद्यांनी परिस्थितीला पॅवलो, स्किनर व वॅटसनसारख्या वर्तनवाद्यांच्या मते व्यक्तीचे व्यक्तीमहत्व म्हणजे अध्ययन केलेल्या विविध प्रतिक्रियांचे एकत्रिकरण होय. त्याच्या मते, प्रबलन, शिक्षा, सामान्यीकरण, विभेदन व विलोपनासारख्या प्रक्रियांद्वारे व्यक्तिमहत्त्वाचा विकास होतो. ज्या प्रतिक्रियांना प्रबलन मिळते. त्या दृढ होतात व ज्यांना शिक्षा मिळते, त्यांचे दमन होते.

बॅण्डुरा हा मुळात वर्तनवादी असला तरी, त्याने परिस्थितीजन्य घटकांसोबत आंतरिक धोकात्मक प्रतिक्रियांना देखील तितकेच महत्त्व दिले. अभिसंधानाव्यतिरिक्त एक वेगळी अध्ययन पद्धती त्याने पुरस्कृत केली व ती म्हणजे निरीक्षणात्मक अध्ययन. बॅण्डुराच्या मते, परिस्थितीत व्यक्तिच्या प्रत्यक्ष घडत असलेल्या विविध घटकांनी तो प्रभावित होतो व त्यातील विविध व्यक्तींच्या वर्तनाचे अनुकरण करतो. त्याच्या वर्तनाचे अनुकरण केले जाते. त्यांना बॅण्डुराने प्रतिरुप असे नाव दिले. पालक, शिक्षक, नट, खेळाडू, संगीतकार व इतर असंख्य व्यक्ती प्रतिरुप (मॉडेल) म्हणून कार्य करीत असतात. त्यांच्या मते, बॅण्डुराने निरिक्षणात्मक अध्ययनाचे चार प्रमुख घटक मांडले - अवधान, धारणा, प्रत्यानयन व प्रेरणा.

बॅण्डुराचा केवळ बाह्य परिस्थितीद्वारे प्रतिक्रियांना मिळणाऱ्या परिणामांवर भर नसून आंतरिक बोधात्मक प्रतिक्रियांना त्याने दिलेले महत्त्व दिसून येते. बॅण्डुराच्या मते लोक प्रतिक्रिया देण्यापूर्वी योजना आखतात. परिणामाबाबत विचार करतात. त्यांच्यावर अपेक्षांचा प्रभाव असतो व ध्येय निश्चिती जाणीवपुर्वक करतात. ध्येय प्राप्त झाले असता ते केवळ बाह्य प्रबलनावर अवलंबुन नसतात तर स्वत:च्या वर्तनावर स्व-नियमन (सेल्फ रेग्युलेशन) करतात. या करिता स्व-प्रबलीकरण (सेल्फ रेन्फोर्समेंट)चा व्यक्तीवर परिणाम होतो. एखादे कार्य व्यवस्थित पार पाडले असता किंवा एखादे ध्येय प्राप्त झाले असता व्यक्तीत एक आंतरिक अभिमानाची व निराशेची भावना निर्माण होते. जी शिक्षेचे कार्य करते. परीक्षेचा निकाल लागल्यावर किंवा खेळाच्या मैदानावर तुम्हास अशा भावनांचा अनुभव आला असेल.

कुठलेही ध्येय आपल्यास प्राप्त करता येईल अथवा नाही. ते प्राप्त करण्याची शारीरीक व बौद्धिक क्षमताच नव्हे तर मानसिक-भावनिक स्थैर्यदेखील आपल्यामध्ये आहे किंवा नाही याची व्यक्तीस जाणीव असते. यामध्ये स्व-परिणामकारकतेत सेल्फ इफ्फिकॅसीची भावना निर्माण होते. ज्याद्वारे ध्येय प्राप्तीबाबतच्या वस्तुनिष्ठ अपेक्षा निर्माण होतात.

बॅण्डुराच्या सिद्धांतातील ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. आपण कधी कधी हे काम कला जमणार नाही, हे माझ्याने शक्य नाही किंवा हे काम मी सहज करु शकेल. हे तर माझ्या डाव्या हाताचे काम आहे. असे स्वत:शी बोलत असतो. यावरुन आपल्याला स्व-परिणामकारकतेचा अनुभव येतो.

**प्रमोद मधुकर येले**
एस.वाय.बी.ए. (मानसशास्त्र)

# इतिहास विभाग



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिनाबद्दल बोलताना उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव.



'माहितीचा अधिकार' या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इतिहास विभागप्रमुख डॉ. जाधव एस. एच.




शिवा कोरड्याची मेट, ता. जव्हार येथील आदिवासी बांधवांना आरोग्य आणि मुलांचे शिक्षण या संदर्भात मार्गदर्शन करताना इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. एच. जाधव आणि प्रा. डी. आर. भोये



इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांसोबत डॉ. डोंगरदिवे व्ही. एम. व प्रा. भोये डी. आर., वाशाळा, ता. मोखाडा येथील जैन लेणीला भेट.



चास, ता. मोखाडा येथील विरगळाचा शोध घेतल्याचा क्षण.



इतिहास विभाग आयोजित 'इतिहास विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. सोनवणे.

# मराठी विभाग



‘वाचन प्रेरणा दिन’ निमित्त प्रा.डॉ. राहुल पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ शुभारंभाप्रसंगी संवाद साधताना मा.श्री. देवेंद्र वैद्य.



‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ निमित्त मार्गदर्शन करताना मा.श्री. धनाजी बुटेरे



‘मराठी भाषा गौरव दिना’प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मा.श्री. राजेंद्र कटीलकर (कवी, व्यंगचित्रकार)



‘श्रावणी कवी संमेलना’त कविता सादर करताना मा.श्री. हनीफ शेख (पत्रकार, पुढारी दैनिक)



‘श्रावणी कवी संमेलना’त कविता सादर करताना मा.श्री. राजेंद्र कटीलकर (कवी, व्यंगचित्रकार)

# सांस्कृतिक विभाग



लोकनेते शरदरावजी पवार साहेब यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी मा.डॉ. रामशेठ ठाकूर, मा.ॲड. भगीरथ शिंदे व उपस्थित मान्यवर.



लोकनेते शरदरावजी पवार साहेब यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त 'वारली चित्रकला प्रशिक्षण' मार्गदर्शक मा. भरत गावित व इतर मान्यवर.



बॅरि. पी. जी. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वत्कृत्व स्पर्धेत वत्कृत्व सादर करताना
कु. अंकुश दखणे (टी. वाय. बी. ए.)



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण्न् जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. एस. जी. मेंगाळ



सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त व्याख्यान. व्याख्याते मा. संतोष मेंगाळ (वाणिज्य विभाग प्रमुख, मोखाडा महाविद्यालय)



राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांची पुण्यतिथी साजरी उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. ई. सैंदनशिव.

# वाणिज्य विभाग



उद्योजकता विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.डॉ. हेमंत मुकणे.



वाणिज्य विभाग आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेत 'Modern Aaccounting practices' या विषयावर मार्गदर्शन करताना मा. डॉ. हेमंत मुकणे.



जागतिक ग्राहक दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रमुख वक्त्या प्रा. मुग्धा कामत.




वाणिज्य विभागाची के. आर. लाडे. अँड. असोसिएट्स, जव्हार येथे अभ्यास भेट.




वाणिज्य विभाग आयोजित जव्हार अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक, मोखाडा शाखेस भेट.



वाणिज्य विभागांतर्गत वादविवाद स्पर्धेत सहभागी विद्यार्थी.

# पद्य विभाग



आयुष्य छान आहे थोडे लहान आहे!
रडतोस काय वेड्या? लढण्यात शान आहे!
काट्यातही फुलांची झुलती कमान आहे!
जगणे निरर्थक म्हणतो तो बेईमान आहे.

''सुखासाठी कधी हसावं लागतं,
तर कधी रडावं लागतं,
कारण सुंदर धबधबा बनायला
पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं...''

- कवी सुरेश भट

# निरोप समारंभ

करुन जावे बरेच काही
निघुन येथुन जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या
निरोप शेवटी घेताना...

आठवणी आपल्या सोबतच्या
पुन्हा पुन्हा आठवतात
नयन सागरात दाटलेल्या
अश्रूंना त्याच तर पाठवतात

वाटले नाही कधी मला
निरोप आपला घ्यावा लागेल
सदा हास्यरुपी गालावर लपलेला
अश्रुचा थेंब नकळत ओघळेल

आठवण एक प्रवाह आहे
हवे तसे वळवता येते
दु:खद आठवणीने रडता-रडता
सुखद आठवणीने हसता येते

आठवणी हसवतात आठवणी रडवतात
काहीच न बोलता
आठवणी निघुन जातात तरी
आयुष्याच्या शेवटी आठवणीच राहतात

कसले होते भाव कधीचे
शब्द जोडीला नसताना
पण कसे सुचवे शब्दांना
तव स्मृतीत गुंतले असतांना

काही माणसं हरवतात
डोळ्यासमोर दिसत असली तरी
आणि काही मात्र दिसत राहतात
डोळ्यासमोर नसली तरी

प्राजक्तानं भरलेली ओंजळ
भोवती सहकाऱ्यांचा वेढा
हरवलेत आता हे क्षण सुगंधाचे
उरलाय फक्त आठवणींचा सडा

सहवास सुटला म्हणून
सोबत सुटत नाही
नुसता निरोप दिल्याने
नाते तुटत नाही

निरोप द्यायचा कोणी
निरोप घ्यायचा कोणी
आपण सारे
निरोपाचेच धनी

निरोप नव्हे हा ओलावा माणुसकीचा
विसरु कसे आम्ही
क्षण हा सौख्याचा

गेले ते दिवस राहिल्या
त्या फक्त आठवणी...

**प्रमोद मधुकर येले**
एस.वाय.बी.ए.

# मैत्री म्हणजे काय असतं?

मैत्री म्हणजे काय असतं?
ते रक्ताचं नसतं, पण हक्काचं असतं
ते सुंदर आणि अनोखं
नातं म्हणजे मैत्री असते...

मैत्री म्हणजे काय असतं?
खुप भांडणं करुनही
अडचणीत जे सावरतं
ते नातं म्हणजे मैत्री असतं...

मैत्री म्हणजे काय असतं?
पोटातली गुपित
व्यक्त करणारं ठिकाण
म्हणजे मैत्री असतं...

मैत्री म्हणजे काय असतं?
एकमेकांच्या जवळ नसतांनाही
आयुष्यभर साथ देतं
ते नातं म्हणजे मैत्री असतं...

मैत्री म्हणजे काय असतं?
सोबत असताना जमत नाही
आणि दूर गेल्यावर करमत नाही
ते नातं म्हणजे मैत्रीच असतं...

मैत्री म्हणजे काय असतं?
निरागस, निस्वार्थी आणि
निरपेक्षपणे जोडलेलं
नातं म्हणजे मैत्री असतं...

**पुनम राजाराम पाटील**
टी.वाय.बी.एस्सी.

# रस्ता (आयुष्यातला मार्ग)

रस्ता हा शब्द बोलायला खुप लहान दिसतो पण
एकदा या रस्त्यावर उतरलं की खूप रस्ते दिसतात
मग ते आयुष्यातले असो किंवा प्रवाशांचे असो
यांच्यामध्ये एवढाच फरक आहे की
प्रवास करणाऱ्याला चालक त्यांच्या ठिकाणी पोहचवतो आणि
आयुष्यातला प्रवास स्वत:ला स्वत:च्या ठिकाणी पोहचावं लागतं
''कारण आपल्या आयुष्यात आपला रस्ता सापडत नसेल तर
स्वत:चा रस्ता स्वत: निर्माण करावा लागतो''
या आयुष्यातल्या रस्त्यावर मार्ग खुप असतात
पण एकदा काय आपला मार्ग योग्य निवडला की
आपल्या आयुष्यातला प्रवास सुखकर होतो
रोजचं आयुष्य तर सगळे जगतात पण
आयुष्याच्या या वाटेवर चालायला आवडीचा रस्ता
खुप कमी लोकं निवडतात, नाहीतर
बरेच जण प्रवाह जाईल तिकडे ओढले जातात...
कधी इच्छेनुसार तर कधी इच्छे विरुद्ध..!

**योगेश टोपले**
टी.वाय.बी.एस्सी. (फिजीक्स)

# माझे जीवन

चालणारे दोन पाय किती विसंगत
एक मागे असतो एक पुढे असतो

पुढच्याला अभिमान नसतो
मागच्याला अपमान नसतो

कारण त्यांना माहित असतं
याचंच नाव जीवन असतं

**अंकुश दखणे**
टी.वाय.बी.ए.

# वेदना

नाजूक साजूक होतं गाव
माळीण त्याचं होतं नाव
सर्वजण सुखदु:ख घेऊन जगत होते
संसाराचा गाडा ते ओढत होते...

क्षणात होत्याचं नव्हतं झालं
आभाळ सारं काळवंडलं
रिमझिम पडणारा पाऊस थय्या थय्या नाचला
त्या पावसाचा भार नाही सोचला
डोंगराने आपला भार गावावर सोपला...

केला निसर्गाने कोप
होतं ते गाव सारं झोप
नाही जाणीव कोणाला
मृत्यू हा ओढावला...

लेकराची माय मातीखाली गेली
पुन्हा लेकरास भेटावया नाही आली
कैक जणांचा जीव गेला
देव असूनही मदतीस नाही आला...

या घटनेने जग सारा दुखावला
प्रत्येकाच्या मन मंदिरात घर करुनी राहिला
आठवण येता दाटते डोळ्यात पाणी
अर्पण भावपूर्ण श्रद्धांजली ही तुमच्या चरणी
अर्पण भावपूर्ण श्रद्धांजली ही तुमच्या चरणी

**प्रा. किरण पारधी**
प्राणीशास्त्र विभाग

# गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी

आठवते ते मॉनिटरचे वाक्य
''शांत बसा, नाही तर फळ्यावर नाव लिहीन''

जेव्हा शाळेत मार खायची वेळ यायची
त्या वेळेस सर एकाला छडी आणायला पाठवायचे
त्यावेळेस आमच्यातला एक उठायचा
आणि म्हणायचा ''माझ्याकडे स्टीलची पट्टी आहे!''

आठवतात त्या क्रीडा स्पर्धा...
आठवतात ते व्हरांड्यात फिरायचे दिवस...
आठवतोय तो सकाळचा परिपाठ...

शाळेतली एक आठवण...
''पाणी पियाला जाऊ का?''
असं विचारुन पाणी पियाला जायचो
आणि पुर्ण शाळा फिरुन यायचो

शाळेमध्ये असतानाचा
एक खतरनाक डायलॉग
''सर, माझा अभ्यास पुर्ण आहे,
पण वही घरी राहिली...

शाळेतील सर्वांचा आवडीचा क्षण म्हणजे
तास चालू असायचा आणि मध्येच
सुचनेचं रजिस्टर यायचं आणि त्यात असायचं
''उद्या शाळेला सुट्टी आहे''

अजुन एक शाळेची आठवण...
प्रतिज्ञेच्या वेळी हात दुखायला लागायचा
आणि समोरच्याच्या खांद्यावर हळूच हात ठेवायचो

''गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी''

**वैभव गवारी**
एस.वाय.बी.ए.

# लॉकडाऊनमधील ऑनलाईन शिक्षण

काय ऑनलाईन शिक्षण असे डोक्याला वैताग जसे
सांगा मी ऑनलाईन शिक्षण घेऊ कसे

शिकवले जरी तुम्ही मोबाईलवरी
मोबाईल घ्यायला पैसे नाही घरी
आधीच कर्ज बापाच्या डोक्यावरी
म्हणून म्हणतात बस झालं शिक्षण आता बसा घरी

दिले घेऊन मोबाईल कसं तरी
दर महिन्याला रिचार्ज मारायचा कुठून सांगा तरी
मारला रिचार्ज जरी कसं तरी
नेटवर्क नाही घरी अन् दारी

नेटवर्कसाठी जावं लागतं डोंगर-टेकड्यावरी
हात जोडून म्हणतो आता येऊदे थोडी तरी
कधी पावसात उभा छत्रीखाली
तर कधी बसतो उन्हांमधी

शिक्षक शिकवितात ऑनलाईन जरी
शिकवता शिकवता मध्ये बंदच पडे
मग जावं लागतं परत घरी
दररोज मजला हा वनवास घडे

जाऊ दे कोरोना हा एकदाचा तरी
मग शाळा-कॉलेज सुरु होतील तरी
दररोज घडला मजला वनवास जरी
ऑनलाईन शिक्षण घ्यायचे सोडणार मी नाही तरी

**मनोज भागीरथ वारघडे**
टी.वाय.बी.ए. (अर्थशास्त्र)

# जिमखाना विभाग




वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



धावण्याच्या स्पर्धेत मुलींचा सहभाग (१०० मी.)



धावण्याच्या स्पर्धेत मुलांचा सहभाग (५०० मी.



कबड्डी स्पर्धा, जिमखाना विभाग अंतर्गत आयोजन, चुरसीचा क्षण.



व्हॉलीबाल स्पर्धेत सहभागी  विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, उपप्राचार्य प्रा. एस. इ. सैंदनशिव



व्हॉलीबाल खेळतांना विद्यार्थी.

# राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रम



योगा शिबिरात मार्गदर्शन करताना मा.श्री. विजय थोरात



महाविद्यालय परिसरात श्रमदान करताना रा. से. यो. स्वयंसेवक



महाविद्यालयात पथनाट्यातून कोविड-१९ जाणीव जागृती



दत्तक गाव पवारपाडा येथे मतदार जाणीव जागृती.




आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'माझी आई माझ्या महाविद्यालयात' प्रसंगी प्रमुख पाहुण्या सौ. सुवर्णा पाटील. समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



कोविड-१९ लसीकरण मोहीम प्रसंगी उपस्थित आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब चत्तर व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.

# राष्ट्रीय सेवा योजना (विशेष श्रमसंस्कार शिबीर)



शिबीर उद्घाटन प्रसंगी मा. सौ. सुनिता पवार, श्री. व्ही. डी. पाटील, श्री. नारायण पवार, श्री. हरी पवार व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



शिबीर कालावधीत तयार करण्यात आलेला कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प.



शिबीर कालावधीत तयार करण्यात आलेला शोषखड्डा.




मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरात शालेय विद्यार्थ्यांची तपासणी.



शिबीर कालावधीत व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. विलास पाटील.



शिबीर समारोपाप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.

# इतर उपक्रम



नवीन प्रशासकीय इमारत भूमिपूजन उद्घाटनाच्यावेळी उपस्थित मा. रामशेठ ठाकूर, मा. ॲड. भगीरथ शिंदे, प्राचार्य मा.डॉ. गणेश ठाकूर व इतर मान्यवर.



बायोफ्लोक भूमिपूजन उद्घाटन करताना टेरी संस्थेचे टीम आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक.



महिला दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन उद्घाटन करतांना मा. सौ. सुवर्णा पाटील (विस्तार अधिकारी पंचायत समिती, मोखाडा)



नवीन इमारतीची पाहणी व चर्चा करताना डॉ. रामशेठ ठाकूर, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, माजी प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव,उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव .



नवीन इमारतीची पाहणी करतांना मा. रामशेठ ठाकूर, मा. ॲड. भगीरथ शिंदे, डॉ. अनिल पाटील व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.



मा. रामशेठ ठाकूर (चेअरमन म. वि. समिती) व मा. ॲड. भगीरथ शिंदे (व्हा. चेअरमन, र. शि. संस्था) यांची महाविद्यालयात सदिच्छा भेट.

# अहवाल विभाग

# अं त रं ग


१. मराठी विभाग

२. अर्थशास्त्र विभाग

३. इतिहास विभाग

४. ग्रंथालय विभाग

५. मानसशास्त्र विभाग

६. वनस्पतीशास्त्र

७. प्राणीशास्त्र विभाग

८. इंग्रजी विभाग

९. वाणिज्य विभाग

१०. गणित विभाग

११. भौतिकशास्त्र विभाग

१२. रसायनशास्त्र विभाग

१३. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यास विभाग

१४. अँटी रॅगिंग कमिटी

१५. आविष्कार कमिटी

१६. परिक्षा विभाग

१७. इनोव्हेटीव्ह आयडिया प्रोग्राम कमिटी

१८. अंतर्गत तक्रार निवारण समिती

१९. रिसर्च कमिटी

२०. सायन्स असोसिएशन

२१. वॉलपेपर कमिटी

२२. प्रसिद्धी कमिटी

२३. सांस्कृतिक विभाग

२४. राष्ट्रीय सेवा योजना विभाग

२५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

२६. कर्मवीर विद्या प्रबोधिनी

२७. शॉर्ट टर्म

२८. स्टाफ अकॅडमी

२९. स्टाफ वेल्फेअर

३०. स्टुडेंट गाईडन्स ॲन्ड कौन्सिलिंग सेल

३१. प्लेसमेंट सेल

३२. करिअर कट्टा

३३. जिमखाना विभाग

३४. आयक्यूएसी

३५. इंटरनेट कनेक्टीव्हिटी कमिटी

३६. गांधी विचार संस्कार परीक्षा

३७. माजी विद्यार्थी मेळावा

### मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये मराठी विषयासाठी १८ विद्यार्थ्यांनी टी.वाय.बी.ए. वर्गात प्रवेश घेतला आहे. टी.वाय.बी.ए. या मराठी विषयाचा वर्ष २०२०-२१ चा निकाल ८८.३३ टक्के लागला आहे. आरडे रोहन मधुकर हा विद्यार्थी मराठी विषयातून विभागात प्रथम आला. मराठी विभागाकडून विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण करण्यासाठी, त्यांच्या साहित्यविषयक अभिरुची विकसित करण्यासाठी मराठी वाङ्मय मंडळाद्वारे विविध उपक्रम राबविले जातात. या वर्षी वाचन प्रेरणा दिन, श्रावणी कवी संमेलन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन, 'मोडी लिपी व नोकरीच्या संधी' एक दिवसीय राज्यस्तरीय वेबिनार, (MOU) अंतर्गत 'वारली चित्रकला प्रशिक्षण' आदि उपक्रम राबविले. त्याच बरोबर मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने लघुचित्रपट, जाहिराती दाखवणे आदि उपक्रम वर्षभर राबवले जातात.

**प्रा. आर.डी. घाटाळ**
मराठी विभाग प्रमुख

### अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये अर्थशास्त्र विषयासाठी १९ विद्यार्थ्यांनी टी.वाय.बी.ए. वर्गात प्रवेश घेतला आहे. टी.वाय.बी.ए. अर्थशास्त्र विषयाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा निकाल १००% टक्के लागला आहे. अर्थशास्त्र विभागांतर्गत टी.वाय.बी.ए. वर्गासाठी कृषी विपणन व एफ.वाय.बी.ए. वर्गासाठी बँकिंग आणि फायनान्स हे दोन Short Term Course चालविले जातात. अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी गुणवत्तेबरोबर महाविद्यालयतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमात सहभागी होतात. अर्थशास्त्र विभागामार्फत Extension Activity अंतर्गत दैनंदिन जीवनातील वित्तीय व्यवस्थापनाचे महत्व या विषयावर पवारपाडा या गावातील लोकाना प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले जाते. अर्थशास्त्र विभागामार्फत विदयार्थी तसेच प्राध्यापक यांच्यात सहकार्य वाढीसाठी तसेच संशोधनाला प्रेरणा मिळण्यासाठी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे, दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली येथील अर्थशास्त्र विभागासोबत MoU करण्यात आला आहे. या MoU अंतर्गत दोन विभागात Faculty Extension चा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. तसेच दिगंत स्वराज फौंडेशन, मोखाडा यांच्यासोबत देखील अर्थशास्त्र विभागाने MoU केला आहे. या MoU अंतर्गत तेलीपदा गावातील गाळमुक्त बंधारा कसा तयार केला जातो तसेच पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी भेट आयोजित केली होती. या क्षेत्र भेटीस दिगंत स्वराज फौंडेशन, मोखाडाचे मा. रामदास बदादे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे यासंबंधी मार्गदर्शन केले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही Budget Analysis-2022 या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २१ मार्च २०२२ रोजी विभागांतर्गत राष्ट्रीय स्तरीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी Importance of Health Insurance in Financial Management या विषयावर राष्ट्रीय स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी रविंदर सिंग चावला व मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे बोर्ड ऑफ स्टडी चे सभासद डॉ. बालाजी सुरवसे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. वाय. एच. उलवेकर यांची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ०२ पुस्तके तसेच आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये ०३ शोधनिबंध प्रकाशित झाली. प्रा. खंबाईत एम. आर. यांचे देखील या शैक्षणिक वर्षात ०३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

**डॉ. वाय. एच. उलवेकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

### इतिहास विभाग

महाविद्यालयात इतिहास हा विषय पदवीसाठी विशेष स्तरावर सुरु आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये इतिहास विषयासाठी २९ विद्यार्थ्यांनी टी. वाय.बी.ए.वर्गात प्रवेश घेतला आहे. टी. वाय. बी. ए. इतिहास विषयाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा निकाल ८६.८८ टक्के लागला आहे. शैक्षणिक वर्ष २०१३ - १४ पासून महाविद्यालयात एम. ए. इतिहास हा विषय सुरू केला आहे. या विषयासाठी एम. ए. प्रथम वर्ष ३० विद्यार्थी आणि एम. ए. द्वितीय वर्षासाठी १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. द्वितीय वर्षाचा २०२० - २१ चा निकाल १००% टक्के लागला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात शासन व विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ऑनलाइन पद्धतीने व काही दिवस ऑफलाईन पद्धतीने अध्यापन करण्यात आले. त्यामध्ये zoom app, google meet, Conference Call या साधनांचा वापर केला. ऑफलाईन पध्दतीत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून विद्यार्थी चर्चासत्र, गटचर्चा आणि शिक्षक दिन, संविधान दिन, महिला दिन या कार्यक्रमांचे आयोजन केले.

इतिहास विभागातील विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेबरोबर महाविद्यालयतर्फे घेतल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमात सहभागी होतात. इतिहास विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी 'आरोग्य व शिक्षण' या विषयावर 'शिवा कोरडयाची मेट' येथील लोकांना मार्गदर्शन केले. मोखाडा परिसरातील सर्व धार्मिक स्थळांना क्षेत्रभेट दिली. इतिहास जतन व संवर्धन उपक्रमाअंतर्गत स्वातंत्र्य सैनिक गणपतराव खरोटे यांच्या स्मारकात स्वच्छता करून नागरिकांना मार्गदर्शन केले. एम. ए. च्या विद्यार्थ्यांनी वाशाळा येथील लेण्यांना भेट दिली. इतिहास विभागाच्या वतीने 'इतिहास विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.

इतिहास विभागातील प्राध्यापक डॉ. जाधव एस. एच.यांनी दोन शोधनिबंध प्रकाशित केले. डॉ. डोंगरदिवे व्ही.एम. यांनी दोन व प्रा. भोये डी. आर. यांचा एक शोध निबंध प्रकाशित केला.

इतिहास विभागाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भोर एल. डी. यांचे सतत मार्गदर्शन असते. इतिहास विभागात सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, कार्यालय यांचे सहकार्य लाभले.

**डॉ. जाधव एस. एच.**
इतिहास विभाग प्रमुख

## ग्रंथालय विभाग

ग्रंथालय हे सामाजिक तसेच शैक्षणिक वर्धेष्णू संस्था आहे. ज्ञान, विचार आणि संस्कृती संवर्धनाचे काम ग्रंथालयातून होत असते. वाचन संस्कृती रुजविणे व विकसित करणे, तसेच संशोधन कार्याला मदत करणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास व जडणघडणीत ग्रंथालयाचा मोठा वाटा असतो. ग्रंथालयामध्ये एकुण २११९४ ग्रंथसंपदा आहे. सन २०२१-२२ या वर्षी ४९२ संदर्भ पुस्तके, क्रमिक पुस्तके खरेदी केली. ग्रंथालयात १८ विविध विषयांची जर्नल, मासिके तसेच ७ वर्तमानपत्रे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचनकट्टा हा उपक्रम राबविला जातो. महाविद्यालयामध्ये समाजातील सर्व लोकांची वाचन संस्कृती वाढावी म्हणून ग्रंथालय हे समाजातील सर्व घटकांना ग्रंथ उपलब्ध करुन देते. मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त फक्त महिला लेखिका यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

बी.सि. बुकबँक योजना : विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्यातर्फे मागास विद्यार्थ्यांसाठी मा. डॉ. एल. डी. भोर हे मार्गदर्शन करीत असतात. ग्रंथालय समितीचे सदस्य यांचेही विशेष सहकार्य लाभले.

**पी. एम. धावणे**
ग्रंथपाल

## मानसशास्त्र विभाग

आपल्या महाविद्यालयात मानसशास्त्र हा विषय प्रथम, द्वितीय व वाणिज्य विभाग तृतीय वर्षासाठी अभ्यासला जातो. आधुनिक युगात मानसशास्त्रचे उपयोजन दिवसेंनदिवस वाढत आहे.

२०१२-२२ या शैक्षणिक वर्षात मानसशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये सॉफ्ट स्किल विकसित व्हावे यासाठी दि.०९ मार्च २०२२ रोजी ठाम प्रतिपादानशीलता (Assertiveness skills) या विषयावर वेबिणारचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वात वाढ होण्याच्या दृष्टीने Personality Development हा शोर्ट टर्म कोर्स राबवण्यात आला या कोर्स साठी एस.वाय.बी.ए या वर्गातील विद्यार्थी घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक व शारीरिक समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावर उपाय योजना करण्यासाठी वैयक्तिक समायोजन चाचणी घेण्यात आली. मानसशास्त्र विषयाच्या वर्षभराच्या उपक्रमांसाठी प्राचार्य.एल.डी भोर व उपप्राचार्य एस.ई सैंदनशिव यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. पी. एल. नाडेकर**
मानसशास्त्र विभाग
